# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि -४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम [illegible] व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१६ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक [illegible] द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)


एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

Email : arcollegesectionug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org


क्रमांक/महा.वि/गो.वि./९८३९/२०१७ दिनांक : ५/०८/२०१७

## परिपत्रक

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य

संलग्नित **शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण** महाविद्यालये

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण व कायम विना अनुदानित/ विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारित ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत

संदर्भ:—१)मा. शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/बी.एड/प्र.क्र७१—१७/सीईटीसेल /९३४० दि. ०१/८/२०१७

२) शासनपत्र क्र. बीएड—४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि—२ दि. ११.७.२०१६

३) शासनपत्र क्र. बीएड—४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि—२ दि. ११.७.२०१६

४) शासनपत्र क्र. बीएड—४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि—२ दि. २७.७.२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. २,३ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१५—१६ व २०१६—१७ करिता शासनाचे सुधारित ना—हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण व कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांपैकी शैक्षणिक वर्ष २०१७—१८ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी नाव नोंदणी केलेल्या महाविद्यालयांना, काही अटीच्या अधिन राहून राज्या शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्राची मुदत शैक्षणिक वर्ष २०१७—१८ करिता शासनातर्फे वाढवून देण्यात आली आहे. व संदर्भीय पत्र आपल्या माहितीकरिता व आवश्यक ती कार्यवाही करण्याकरिता संलग्नित आहे.

सहपत्र:— वरिलप्रमाणे

(डॉ. व्ही. सी. सिल्हारे)
प्र. उपकुलसचिव (म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतीलिपी आपल्या माहितीस्तव:—

मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत,पूणे—४११००१

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : bed:dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्रमांक-उशिसं/बी.एड./प्र.क्र.७१-१७/सीईटीसेल/ ८३४० दिनांक : - 1 AUG 2017

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण व
कायम विना अनुदानित / विना अनुदानित शिक्षणशास्त्र
अभ्यासक्रमांची महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

**विषय : अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण व कायम विना अनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

संदर्भ : १. शासनपत्र क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि. ११.०७.२०१६
२. शासनपत्र क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि. ११.०७.२०१६
३. शासनपत्र क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(५)/मशि-२, दि. २७.०७.२०१७
४. शासनपत्र क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि. २७.०७.२०१७
५. शासनपत्र क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि. २७.०७.२०१७

उपरोक्त विषयी, संदर्भ क्र. १ व २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ करिता शासनाचे सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण व कायम विनाअनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांपैकी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी नाव नोंदणी केलेल्या महाविद्यालयांना, काही अटींच्या अधीन राहून राज्य शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची मुदत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता शासनातर्फे वाढवून देण्यात आली आहे. सुलभ संदर्भासाठी शासनपत्राची प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

( डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

( कृ. मा. प. ).

प्रत -

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२/- त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व अनुदानित शारीरिक शिक्षण व कायम विना अनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना शासनाचे सुधारित ना-हरकत प्रमाणपत्राबाबत कळवावे व शासनपत्रातील निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य, यांना शासनपत्रात नमूद केलेल्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

(2

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
27 JUL 2017
आवक क्रमांक:- ९६९०३
शाखा:- सीईटी-सेल

महाराष्ट्र शासन

क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७जुलै, २०१७.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ :- (१) शासन पत्र क्रमांक : बीएड.४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.११.०७.२०१६,**
**(२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्रमांक : उशिसं/२०१७/ प्र.क्र.३३२/सीईटी सेल, दि.२७.०६.२०१७ व क्रमांक उशिसं/२०१७/ प्र.क्र.३३२/सीईटी सेल/८२७७, दि.१२.०७.२०१७.**

महोदय,

वरील विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील पत्रास अनुसरुन, संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ करिता शासनाचे सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना, खालील अटींच्या अधीन राहून राज्य शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची मुदत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता वाढवून देण्यात येत आहे :-

(क) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता एन.सी.टी.ई., भोपाळ ने संबंधित महाविद्यालयास शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमास यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी संलग्निकरण दिलेले आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयांची नोंदणी करताना करावी.

सीईटी सेल
श्री संदीप
For n.a.p.l.
(signature) २८/७

(ख) एन.सी.टी.ई.,भोपाळ यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत बी.एड/एम.एड/बी.पी.एड./एम.पी.एड. अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मधील तरतुदी विहित केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार

कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) सर्व विभागीय सहसंचालकांना शारिरीक शिक्षण महाविद्यालयाच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व एन.सी.टी.ई. ने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता तीन महिन्यांच्या कालावधीत करण्याबाबत तात्काळ संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात यावे. संबंधित महाविद्यालयांनी सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता तीन महिन्यांच्या कालावधीत करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ङ) संचालक, उच्च शिक्षण यांनी विभागीय सहसंचालकांनी केलेल्या तपासणीत निदर्शनास आलेल्या त्रुटी व एन.सी.टी.ई./आर.सी.आय.ने विहित केलेल्या सुधारित निकषांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने विभागीयस्तरावर समिती गठीत करुन संबंधित महाविद्यालयांची प्रत्यक्षात तपासणी सहा महिन्यात पूर्ण करावी व त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल अभिप्रायासह शासनास सादर करावा.

(च) ज्या महाविद्यालयांकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता उक्त कालावधीत करण्यात येणार नाही, त्या महाविद्यालयांची नावे एन.सी.टी.ई. यांना कळविण्यात यावी, तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(छ) एन.सी.टी.ई. कडून होणाऱ्या तपासणी दरम्यान, एन.सी.टी.ई.च्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव सदर महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांची मान्यता रद्द केल्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

आपली,

( रोहिणी भालेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
३) सर्व संबंधित अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत),
४) निवड नस्ती (मशि-२).

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
27 JUL 2017
आवक क्रमांक:- ९६९०३ ९६२४०
शाखा:- सीईटी सेल

महाराष्ट्र शासन

क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ जुलै, २०१७.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ :-** (१) शासन पत्र क्रमांक : बीएड.४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि.११.०७.२०१६,
(२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्रमांक : उशिसं/२०१७/ प्र.क्र.३३२/सीईटी सेल, दि.२७.०६.२०१७ व क्रमांक उशिसं/२०१७/ प्र.क्र.३३२/सीईटी सेल/८२७७, दि.१२.०७.२०१७.

महोदय,

वरील विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील पत्रास अनुसरुन, संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ करिता शासनाचे सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना, खालील अटींच्या अधीन राहून राज्य शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची मुदत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता वाढवून देण्यात येत आहे :-

(क) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता एन.सी.टी.ई., भोपाळ/आरसीआय, नवी दिल्ली यांनी संबंधित महाविद्यालयास शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमास यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी संलग्निकरण दिलेले आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश प्रक्रियाकरिता महाविद्यालयांची नोंदणी करताना करावी.

(ख) एन.सी.टी.ई., भोपाळ/आरसीआय, नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत बी.एड./ एम.एड./ बी.पी.एड./ एम.पी.एड. अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/ प्र.क्र.२१/ कार्या-५, दि.२३.५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब)

व (क) मधील तरतुदी विहित केलेल्या अल्पसंख्यांक/ बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) सर्व विभागीय सहसंचालकांना शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयाच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व एन.सी.टी.ई., भोपाळ/आरसीआय, नवी दिल्ली ने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता तीन महिन्यांच्या कालावधीत करण्याबाबत तात्काळ संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात यावे. संबंधित महाविद्यालयांनी सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता तीन महिन्यांच्या कालावधीत करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ङ) संचालक, उच्च शिक्षण यांनी विभागीय सहसंचालकांनी केलेल्या तपासणीत निदर्शनास आलेल्या त्रुटी व एन.सी.टी.ई./आर.सी.आय.ने विहित केलेल्या सुधारित निकषांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने विभागीयस्तरावर समिती गठीत करुन संबंधित महाविद्यालयांची प्रत्यक्षात तपासणी सहा महिन्यात पूर्ण करावी व त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल अभिप्रायासह शासनास सादर करावा.

(च) ज्या महाविद्यालयांकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता उक्त कालावधीत करण्यात येणार नाही, त्या महाविद्यालयांची नावे एन.सी.टी.ई., भोपाळ/आरसीआय, नवी दिल्ली यांना कळविण्यात यावी, तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(छ) एन.सी.टी.ई., भोपाळ/आरसीआय, नवी दिल्लीकडून होणाऱ्या तपासणी दरम्यान, एन.सी.टी.ई., भोपाळ/आरसीआय, नवी दिल्लीच्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव सदर महाविद्यालयांतील अध्यासक्रमांची मान्यता रद्द केल्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

आपली,

( रोहिणी भालेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
३) सर्व संबंधित अशासकीय अनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत),
४) निवड नस्ती (मशि-२).